
१०६८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १९५६



अविनाश वरोकर

REFBK-0016983
REFBK-0016983

१९६८

१९५०

१९५६

काव्य

64932
१७।३।५७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
* १९७० *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम
अनुक्रम 64932 वि: काव्य
क्रमांक १९५६ नोंद दि १७।३।५७

• नूरन •

# नूरन

( खंडकाव्य )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. १६९८३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

अविनाश वरोकर

REFBK-0016983
REFBK-0016983

नागपूर प्रकाशन

नागपूर प्रकाशन, नागपूर १

— प्रकाशक —
दि. मा. घुमाळ
'नागपूर प्रकाशन'
सीताबर्डी, नागपूर

नागपूर प्रकाशन क्रमांक १०५
प्रथमावृत्ति—
१ आक्टोबर १९६८

— सर्वाधिकार —
प. झो. अुपाख्य अविनाश वरोकर
धंतोली, काटोल (महाराष्ट्र)

— मुखपृष्ठ —
श्री. दीनानाथ दलाल
मुंबई

— मुद्रक —
ल. म. पटले
'रामेश्वर प्रिंटिंग प्रेस'
सीताबर्डी, नागपूर

किंमत तीन रुपये

विभाजनाच्या वणव्यात होरपळलेल्या
निष्पाप जीवांना --

-अविनाश वरोकर

राजा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
८५९३२ विः काव्य
१९५६ नोंद दि. १८।३।७१

# ऋणनिर्देश

विभाजनामुळे निर्माण झालेल्या दुःखद आणि दुर्दैवी घटना विशद करणारी ख्यातनाम लेखक श्री. कुशवंतसिंग यांची ' Train to Pakistan ' ही कादंबरी माझ्या नजरेखालून गेली. आणि मी कमालीचा अस्वस्थ झालो. जवळ जवळ दहा वर्षे त्या हृदयभेदक आणि प्रक्षोभक घटनांनी रात्रंदिवस माझा एकसारखा पाठलाग केला. अंतःक्षोभ वाढतच गेला. मी झपाटल्या गेलो व त्या अवघड मनो-व्यथेतूनच माझं ' नूरन ' हे खंडकाव्य साकार झालं.

या कार्यपूर्तीसाठी मला माझ्या अनेक मित्रांनी अत्यंत जिवा-भावानं सहकार्य दिलं. ' शशिमोहन ' कर्ते प्रा. यादव मुकुंद पाठक यांनी प्रस्तावना लिहून मला आशीर्वाद दिला. माझे जिव्हाळ्याचे कविमित्र श्री. नीलकांत ढोले, काटोल यांचे सहकार्य शब्दातीत आहे. त्यांचे आभार कसे मानू ? याशिवाय ' नागपूर प्रकाशन ' संस्थेचे श्री. दि. मा. घुमाळ व ' रामेश्वर प्रिंटिंग प्रेस ' चे श्री. ल. म. पटले यांचेहि बहुमोल साह्य या कार्याला लाभले. या सर्वांचा मी फार आभारी आहे आणि राहीन. महाराष्ट्राचे लाडके चित्रकार श्री. दीनानाथ दलाल यांनी अप्रतिम सुंदर आणि मनोवेधक विविध रंगी मुखपृष्ठ तयार करून दिले याबद्दल मी त्यांचा येथे स्वतंत्र ऋणनिर्देश करतो. यानंतर माझ्या या कृतीचं योग्य मूल्यमापन करण्याचं कार्य मी वाचकांच्या रसिकतेवर सोपवितो.

धंतोली, काटोल
' विजयादशमी '
दि. १ आक्टोबर १९६८

—अविनाश बरोकर

# आशीर्वाद

गेल्या दीड दशकात किमान सहा काव्यपुस्तकांना प्रस्तावना लिहिण्याचा योग आला. आमूलाग्र काव्यक्रांतीच्या या काळात सर्वत्र अराजक माजले असताना, जुने सर्व नेस्तनाबूत झाले आणि कुठल्याहि नव्या निष्ठा स्थिरावू शकल्या नाहीत अशा या काव्य-प्रांतात, थोडेबहुत मार्गदर्शन करण्याचे श्रेय लाभले, ही काही कमी कमाई नाही. “शशिमोहन” या खंडकाव्याचा प्रणेता, “विहंगम” मासिकाचा संपादक, पांच महाविद्यालयांचा शुभारंभकर्ता, ३५ वर्षे जिव्हाळ्याने युवकांना मराठीच्या अध्ययनात रमविणारा प्राध्या-पक, अनेक कविसंमेलने गाजवणारा कवि वा अध्यक्ष : एक ना दोन, अशा आणखी कितीतरी नात्यांनी नाना भूमिकात रमलो आणि सत्य, शिव आणि सौंदर्याचा शोध घेत राहिलो. पूर्वी पुष्कळ प्रस्तावना लिहिण्याचा प्रसंग शब्दशिल्पी प्रा. श्री. नि. चापेकर आणि साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांच्यावर आलेला पाहत होतो. चापेकरांचे अघळपघळ मोजमापे आणि केळकरांची मार्मिक

व्याजस्तुती : या व्यक्तिनिविष्ठ कवायतींनी मन रिझे. प्रस्तावने-करिता, पुस्तक मुद्रित झाल्यावर, चापेकरांकडे दोन दोन वर्षे थांबावे लागे. केळकरांची उरक मोठी. मायदेवांच्या कवितांच्या त्रुटित स्वरूपाविषयी नाखूश असतानाहि त्यांनी लिहिले—"गेयतेच्या दृष्टीने, या कविता लहान आहेत, हा त्यांचा मोठा गुणच म्हणा-वासा वाटतो." चापेकर प्रस्तावनेच्या अखेरीस 'पसायदाना'तील 'दुरिताचे तिमिर जावो' ही ओवी हमखास लिहीतच. 'जो जे वांच्छील तो ते लाहो—प्राणिजात' याचा ते अक्षरश: उदार प्रयोग करीत आणि त्या पुस्तकाच्या लेखक—कवीला ज्ञानेश्वराच्या पदवीला नेऊन बसवत. परिणाम असा होई की कवीच्याबरोबर प्रस्तावनालेखक चापेकरांचीहि लब्धप्रतिष्ठित समीक्षक अमाप थट्टा करीत.

आज प्रस्तावना लिहिताना ती भीति बाळगण्याचे कारण नाही. जिथे समीक्षालेख तर काय, नुसता अभिप्राय येण्याचीहि मारामार, तिथे अनुल्लेखांनीच मूक स्वागत होणार! तथापि चोखंदळ वाचकवर्ग आता खूब वाढला आहे. हे 'खंडकाव्य' मराठीतील ज्ञात—अज्ञात शेकडो कवि तरी वाचतील. परंतु तेहि कधी बापडे पत्र लिहीत नाहीत. नूतन प्रकाशित पुस्तक म्हणजे सुटलेला बाण आहे, परत येणारे अस्त्र नाही. पण त्यातहि दशरथा-सारखा एखादा पुत्रविरहाचा शाप मिळणारा अभागी निघतोच.

श्री. अविनाश वरोकर यांचे हे खंडकाव्य माझ्या आशीर्वादाने प्रसिद्ध व्हावे ही त्यांची मनोमन इच्छा. त्यांच्या निष्ठेची परीक्षाहि मी खूब घेतली. गेल्या दोन वर्षांत ते प्रथम तुमसरला व नंतर येथे असे पांच वेळा तरी मजकडे आले. त्यांनी आपल्या 'नूरन'ची दोन तीन तरी पारायणे मजबरोबर केली असतील. अखेर मी आपला "आशीर्वाद" द्यायची संमति दिली. माझे मित्र माधव जूलियन् आपल्या कवितेचे पुन्हःपुन्हा परिष्करण करीत असत. तसाच दुरुस्तीचा नाद श्री. वरोकरांना आहे. त्यांच्या मला दाख-

विलेल्या मुद्रणप्रतीत व अखेरीस माझ्या हाती पडलेल्या मुद्रित प्रतीत बरीच तफावत आहे. मुद्राराक्षसाचे एक असो, पण या परिष्करणामुळे अनेक विरस करणारे बदल शिरलेले आहेत.

या मनूच्या माशाला विराट रसिकहृदयांच्या महासागरात सोडताना त्याने मुक्तपणे संचार करणे साहजिक आहे. तेव्हा रसिकांच्या उदार अंतःकरणावर व सहृदयतेवर विसंबून मी त्यांच्या 'नूरन'ला म्हणतो: 'आजच्या पोरी पण उद्याच्या आई ! सुखरूप जा. हा म्हातारा तुला 'टाटा' करितो आणि तुझ्या आसवांचे कारुण्य पचवून तुला आशीर्वाद देतो. 'कीर्तिमंत हो. चिरंजीव हो.'

* * * * *

एका तपापूर्वी साहित्यभूषण तु. ना. काटकर यांच्या "नौखाली" या खंडकाव्यास प्रस्तावना लिहिण्याचा प्रसग आला होता. फार मोठी आपत्ति होती. दोषाविष्करण काटकरांच्या प्रकृतीस मानवणारे नव्हते. प्रसंशा करणे म्हणजे आपला 'चापेकर' होणार. तेव्हा मी महात्माजींच्या "नौखाली" प्रकरणाच्या महत्तमतेविषयीच तेवढे लिहिले व काव्याच्यासंबंधी संपूर्ण मौन पाळले. आजहि वरोकरांचे हे पहिलेच ग्रंथापत्य असल्यामुळे व ते हौशी व हळुवार वृत्तीचे असल्यामुळे, प्रस्तुत काव्याचे मला ज्या वृत्तीच्या दुर्बिणीतून आरपारदर्शन (perspective) घडले आहे, तेच यथाशक्ति चित्रित करण्याचा माझा मानस आहे. अगदी आरंभी केवळ गंमत म्हणून कवि वरोकरांना एक गणित सोडविण्यास सांगतो. हे कथानक काव्यात साकारताना त्यांना तब्बल अकरा वर्षे लागली. गर्भात नऊ महिने राहिलेला मानव जर शंभर वर्षे जगतो, तर अकरा वर्षे गर्भातच वास्तव्य करणारा हा काव्यशुकाचार्य किती वर्षे जगू शकेल ? आपल्या अपत्याला मिळणाऱ्या या अमरता-सदृश प्रदीर्घतेच्या कल्पनेने कवीचे मन प्रसन्न होवो. आता

राहिला रसिकांच्या प्रसन्नतेचा प्रश्न ! त्यासाठी थोडी पार्श्वभूमि तयार करावी लागेल.

महाकाव्यनिर्मिती ही या शतकात मराठीत झाली नाही. खंडकाव्यांची निर्मितीहि विपुल प्रमाणात होत नाही. प्रा. वा. म. जोशी यांनी महाकाव्य लेखनाच्या अभावाची कारणे दिलेली आहेत. तळोधीच्या भाषणात इतर भारतीय भाषात महाकाव्ये-खंडकाव्ये सारखी लिहिली जातात हे सांगून, महाकाव्यांच्या निर्मितीचे व आस्वाद्यतेचे उदाहरण म्हणून मी वल्लतोल या मल्याळी महाकवीचा व त्याच्या काव्याचे सार्वजनिक-सामूहिक मुखोद्गत पाठ म्हणणाऱ्या मल्याळी सामान्य मजूरांचा उल्लेख केला आहे. मराठीत साधुदासांची काव्ये स्मृतिशेष झाली असली तरी गिरीश, यशवंत, माधव जूलियन्, अनिल, पाठक, ना. ग. जोशी, मनमोहन इत्यादिकांची खंडकाव्ये प्रसिद्ध आहेत. तोडमलाने 'खंडकाव्या'वर डॉक्टरेट मिळवली आहे आणि खंडकाव्याची व्याख्या व इतिहास आपल्यापरीने त्यात दिला आहे. 'खंडकाव्य' हा प्रकार, अतएव, आधुनिक मराठीला प्रिय झालेला आहे. कथात्मक खंडकाव्याची प्रकृति 'काव्य' कल्पनेस अननुकूल आहे म्हणून काही कवींनी कथेला हद्दपार करून वैचारिक, भावकल्लोळात्मक इ० अभिनव खंडकाव्याची निर्मिती केलेली आहे. माझे मित्र अनिलांनी 'भग्नमूर्ति' काव्याला जी प्रस्तावना जोडली आहे, ती या दृष्टीने पाहण्यासारखी आहे. भावगीतांचा कथात्मक गुच्छ यशवंतांनी 'जयमंगले'त तयार केला, तर विरहतरंगात माधव जुलियनांनी स्मृतिमालिकेची गुंफण केली. माडगूळकरांचे "गीतरामायण" हा तर एक अत्यंत लोकप्रिय झालेला खंडकाव्याचाच नवा आविष्कार आहे. माझे महाविद्यालयीन शिष्य व आजचे अग्रेसर समीक्षक प्रा. डॉ. द. भी. कुळकर्णी आपल्या अप्रकाशित प्रबंधात महाकाव्याची जागा अलीकडील कादंबऱ्यांनी घेतली आहे असे मानतात व महाकाव्य

व कादंबरीच्या या अभेदाने कथात्मकतेची त्याची मूलप्रकृतीच गृहीत धरतात. साहित्यक्षेत्राच्या बाहेरील अत्यंत लोकप्रिय आणि घरोघर भक्तीने वाचली जाणारी गजानन महाराजाच्या लीला चरित्रांची निर्मिती स्वकल्याणार्थ तडफडणाऱ्यांना अत्यंत प्रिय झालेली आहे. तीहि भाविक क्षेत्रातील खंडकाव्याचाच प्रकार मानावा लागेल.

केवळ कथाच सांगायची असली तर ती गद्यात उत्कृष्ट सांगता येते, तिच्या निवेदनाकरिता काव्याच्या म्हणजे पद्याच्या पेहरावाची सुतराम् आवश्यकता नाही, असा एक विचाराचा प्रवाह अलीकडे विशेष वाहू लागला आहे. अलंकार, रीति, ध्वनि व रस हे पूर्वी काव्याची प्रधानांगे होती आणि काव्यसमीक्षेची निश्चित अशी कसोटी सर्वांना उपलब्ध होती. माझे मित्र कविवर्य मर्ढेकर यांनी मराठीत एक आमूलाग्र क्रांति केली तेव्हापासून तो निकषच नष्ट झाला. या नव्या काव्यासह नवी समीक्षा जन्मास आली आणि सौंदर्यशास्त्राचाहि उहापोह सुरू झाला. तिर्यकता, प्रतिमा, भावना-निष्ठ समतानता, तर्क व अर्थाची हद्दपारी, अशी काहीशी संदिग्ध भाषा आंगवळणी पडली. संज्ञाप्रवाह, घाट–आकार हे शब्द प्रच-लित झाले. अनेक प्रयोग होऊ लागले आणि अनेक व्यक्तिगत निष्ठा निर्माण झाल्या. रत्नाची पारख जशी तज्ज्ञाची मिरास झाली, तशी काही मोल चढलेल्या संपादक–समीक्षकांच्या लहरीवर काव्य कवींची प्रतिष्ठा विसंबून राहिली. · · · त्यांनी शिक्का-मोर्तब केले ते काव्य म्हणजे विशुद्ध काव्य · · · · · खरे काव्य, इतर ते अकाव्य अशी समजूत दृढ झाली. सामान्य रसिकांनीहि तज्ज्ञाचे निर्णय मान्य केले, मान तुकवली, पण त्यांना स्वतःला मात्र ते काव्य आस्वाद्य वाटेनासे झाले, कळेनासे झाले. नव्या फॅशनला बळी पडणे हा सामान्यांचा नित्याचाच धर्म असतो. अशा रीतीने आपल्या प्रतिष्ठेकरिता या काव्याचा मान ठेवणे, पण काव्यवाचना-पासून दूर जाणे, त्याच्या वाटेस न जाणे, असा प्रतारणेचा पायंडा

पडला, आणि काव्य एका अलिप्त आवर्तात अडकून पडले व रसिक मनांपासून दूर गेले.

* * * * *

तथापि याच गेल्या दशकातील बहुसंख्याक तरुण कवींना मधुर शब्दांच्या आणि प्रतिमांच्या किमयेने भारले व मधुर अभि· व्यक्तीच्या माध्यमातून कवितेला त्यानी एक नवा घाट आणला. निवडक शब्दांचा हव्यास, नवनव्या नजाकतदार लकबांची अभि-व्यक्ति त्यांनी लीलया आत्मसात् केली आहे. ही बहुरंगी बहुढंगी बाह्यरूपाची सौंदर्यसाधना तरुण कवीत आणि रसिकात आज अत्यंत लोकप्रिय झाली आहे. श्री. अविनाश वरोकरहि याच काव्यकलेचे पाईक आहेत. या नव्या रम्यशैलीचा वापर इतर कवीं-प्रमाणे केवळ चिमण्या भावकवितातच न करिता, त्यांनी तिला प्रस्तुत खंडकाव्याच्या निर्मितीत राबवली व एका नव्या सामर्थ्याचा उच्चांक गाठण्याचा हा सफल प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत खंडकाव्याची नायिका एका ठिकाणी म्हणते :

" रजत रसातच न्हाऊ आपण
तरल विरल या दुग्ध धुक्यातुन
अभिनव विश्वा निर्मू आपण···· !"

या काव्यनिर्मितीच्या प्रक्रियेत कवीचीहि हीच सुप्त मनीषा असावी, असे त्याच्या सम्यक् परिणामावरून प्रत्यंतरास येते. येथे आपण एका स्वप्नसृष्टीत वावरत आहोत असा रम्य वा भेदक आभास होतो. अतीव भावुकता, सूचक कल्पकता, वेधक प्रतिमांचा वापर आणि नादमाधुर्याच्या लयीतून होणारे येथील अधुरे–अपुरे दर्शन, म्हणजे चांदण्यातून विहार करण्याचाच विलक्षण आनंद आपणाला होतो. आणि या कथासूत्राधिष्ठित खंडकाव्यातून अखेरीस कथाच जेव्हा गळून पडते, तेव्हा तर एका अभिनव खंडकाव्याची निर्मिती येथे सहजतेने होऊन गेली हे जाणवते ! नव्या कालांतील प्रवृत्तीला

मानवणारा हा एक निगूढ अमूर्त (Abstract) कलेचा विलास आहे.

* * * * *

ज्ञानेश्वरांची 'रेखा' आणखी 'शैली' (Style) यात फार फरक आहे. रेखा रेखीवपणा आणण्याकरिता नियमबद्ध चाकोरी निर्माण करते, विमुक्त विहार करते आहे असे भासवते, तथापि परंपरेतून आलेल्या चालीरीतीतून शिस्तबद्ध पाऊले टाकते. कवीच्या व्यक्तित्वाची अलिप्तता 'रेखे'त स्पष्ट जाणवते. या उलट "Style is the man" या उक्तीप्रमाणे 'शैली' कवीच्या व्यक्तित्वावरच पूर्ण विसंबून असते. या खंडकाव्यात नव्या रेखेचे रंगढंग श्री वरोकरांना अवगत आहेत (नुकतेच अनुकरण-शीलतेच्या अवस्थेतून ते मोकळे होत आहेत) हे जाणवते. तथापि तटस्थतेची ही भूमिका कितीहि घेतली तरी कवीची मनोवृत्ति थोडीबहुत तरी सूक्ष्मपणे डोकावतेच डोकावते. कवीचे व्यक्तित्व कसे आहे याचा अजमास मुळीच करता येऊ नये, इतके ताटस्थ्य त्यांना राखता आले नाही. तादात्म्य भावाने कवि डोकावला तर त्याला हरकत नाही. पण ते होताना कवीचे व्यक्तित्व लोभनीय, अव्याज, स्वयंभू, आदर्शाची उपासना करणारे असले पाहिजे म्हणजे काव्याची बैठकच उंचावते. आणखी विकास प्रक्रियेत आत्मविश्वासाने स्वयंनिर्णय घेतला पाहिजे, न्यूनगंडात्मक पर-धार्जिणेपणा मारक आहे. नाटकातले उसणे पेहराव तात्पुरते असतात. दिखाऊ थाटमाटापेक्षा टिकावू साधेपणा पुरवला. ही ऋजुता व्यवहारतेबरोबर बाणली म्हणजे काव्य हा गंभीर जीवनधर्म होतो. नुसत्या हौसेचा; क्रीडेचा, हलकाफुलका खेळ राहत नाही. या अनाहूत सूचनांचा काय परिणाम होईल तो होवो. जिव्हाळ्यापोटी पोटतिडीक यावयाचीच। 'खंडकाव्य' 'महाकाव्या'ची साधना कठीण असते आणि ताटस्थ्याची भूमिका येथे जास्त महत्वाची असते.

नाटकात तर ताटस्थ्याची मर्यादा ओलांडणें धोक्याचेच असते म्हणूनच एवढा प्रपंच करावा लागला !

*  *  *  *  *

प्रस्तुत काव्यातील अधुरे अपुरे सौंदर्यदर्शन, आजकालच्या तरुण रसिकांच्या आवडत्या शैलीतून होते. यालाच रेखासौंदर्य व घाटाचे सौंदर्य म्हणता येईल... नादाने भारलेल्या, शब्दमाधुर्याने ओथंबलेल्या प्रस्तुत काव्यातील अनेक ओळी मंत्रमुग्ध करतील.

स्मित वलयाचे लेउन लेणे
चंद्रकोर ही खुले प्राचिवर
नीलोत्पलि अन् मुग्ध कपोली
अनुरागाचे अंकण नवथर ····· !

असे 'नूरन' या नायिकेचे वर्णन किती गोड आहे! आज नव्या काव्याची अर्थदृष्टचा छाननी करण्याची मात्र पद्धती नाही. मनावर होण्याऱ्या अधुऱ्या परिणामावरच संतुष्ट राहिले पाहिजे. अर्थाची चीरफाड म्हणजे आता शवच्छेदचिकित्सा (Post Mortem मानतात !

नायक–नायिकेच्या प्रणयसंगमातील––

शपथ तुझ्या उत्फुल्ल तनूची
नकोस विसरू रात सुहानी
अधर फुलातिल पराग अपुल्या
श्वासांनी ही लिहिल कहाणी––

या ओळी एका षोडशवर्षा तरुण कुमारिकेला फार फार आवडल्या ! एका तारुण्यात पदार्पण करणाऱ्या मुलाला हे संपूर्ण काव्य फार आल्हाददायक वाटले. तथापि त्याला कथेची संगति लागली नाही, अर्थाची मातब्बरी वाटली नाही. काव्यच रसिकांच्या हाती असल्यामुळे व सर्वत्र रचनेचे माधुर्य सारखेच असल्यामुळे जास्त अवतरणे देण्याची आवश्यकता नाही.

*  *  *  *  *

या खंडकाव्याचा अधुरा परिणाम होण्याचे दुसरे कारण कथा सांगण्याकडे कवीचा कल नाही. कथानकाचे धागेधोरे जुळविण्यात व सांधेजोड साधण्यात कवि फार संयम पाळतात व सूचक गतिमानता अशाच ठिकाणी त्यांच्या निवेदनात येते. यामुळे गोष्टीचे दुवेच निखळून पडतात व विदर्भातील वसंतऋतूच्या निर्झराच्या पात्राप्रमाणे येथे अनेक संगमोत्सक डोह निर्माण होतात.

Train to Pakistan या कादंबरीच्या संक्षिप्त वृत्तांताचा कवीच्या मनावर उत्कट परिणाम झाला. तथापि कवीने आपले वेगळेच कथानक आकारास आणले. विभाजनाच्या पार्श्वभूमीवरील हिंसेचे अमानुष थैमान त्यांच्या मनाला खोल जखम करून गेले.

रसिकांच्या सोयीसाठी कथासूत्राचे टप्पे सांगितले पाहिजेत. नायिका 'नूरन'चे थोडक्यात वर्णन, 'मनोमांजरा' गावाचे ओझरते दर्शन, जगिया व नूरन यांच्या प्रणयमीलनाचे सविस्तर चित्रण, कुमारिकेला गर्भ राहणे आणि विभाजनाचा उडालेला भडका ! जगियाची तुरुंगात रवानगी, त्याची विरहव्यथा, नूरनचे चिंताकुल जीवन, पाकिस्थानात जाणार म्हणून तुरुंगात जाऊन तिने जगियाला भेटण्याचा प्रयत्न करणे, जगियाच्या आईचा निरोप घेणे, जगियाची तुरुंगांतून सुटका व 'नूरन' जाणार त्या गाडीवर ज्यामुळे भयंकर अपघाताचे संकट येणार होते, तो पुलावरचा आडवा दोर कापून या कार्यामुळे भडकलेल्यांच्या गोळीला बळी पडणे, हे या कथासूत्रातले सलग भाग होत.

येथील विभाजन कांडातील सैतानी प्रक्षोभाचे चित्रण मोठे विदारक आहे.

> मातीचा सुत विराट मानव
> उरात खंजिर, म्हणे " विभाजन !
> कणकण कापुनि उर आईचे
> दोन तराजुत तोलू आपण ....

या सुंदर उद्रेकात व 'योनि उसवल्या शरपात्यांनी' 'चरचर चिरुनी उरज कंचुकी' 'लिंग कापुनी देत करावर' इत्यादि स्पष्टोद्गारात कवीच्या मनावर ते भयानक अत्याचार किती खोल परिणाम करून गेले, हे दिसून येईल. मूळ कादंबरीच्या सारांशाचा जो भाग कायमचा कोरला गेला, तो येथे जशाच्या तसा प्रकट झाला. आता मर्ढेकरानंतरच्या काळात अनौचित्य वा असद्-भिरुचीचा आरोप या निर्देशांवर कुणी करणार नाही.

कवि श्री अविनाश वरोकर यांना अखेरीस प्रेमाचा आशीर्वाद देताना, वाचकांना येवढेच विनवायचे की 'जे रोचक असेल त्याचे ग्रहण करा, जे रुचणार नाही त्याचा त्याग करा.'

२३०, अभ्यंकर नगर,
नागपूर
११-८-६८

यादव मुकुंद पाठक

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७६०८३
संग्रह शाखा

हरित तृणांच्या नील झळीतुन
सलज्ज नलिनी खुद्कन् हसते
दडवुन नयनी भाव अनामिक
लाजाळूचे मिटते पाते..!

उरोज उन्नत, नयन शराबी
नवतीची नव नवी नव्हाळी
किणकिणती करि नवथर बिलवर
सकंप अधरी लकब आगळी..!

कुंतल भाली, भांग गुलाली
उरोज सन्मुख मधुप आवली
पायी पैंजण वाजत रुणझुण
नव उन्मेषित कमल पाकळी..!

स्मित वलयाचे लेउन लेणे
चंद्रकोर ही खुले प्राचीवर
नीलोत्पलि अन् मुग्ध कपोली
अनुरागाचे अंकण नवथर..!

नूरन नांव नि नयन निरागस
पदर डोइवर मूक पापणी
गवयाचीं कुणि लकेर नाजुक
सप्त सुरातिल तरल विराणी

मुसलमान् कोष्टयाची कन्या
जरतारी जरि किनार साजुक
वळणावरती वळतांना कधि
नेत्र पालवी लवते भावुक..

*　　*　　*

ग्राम मनोहर 'मनोमाजरा'
सतलजच्या स्थित ऐलतटावर
कौलारू मातीची घरटी
रविकिरणांची पखरण त्यावर

शिवारात या गाव शिवेवर
सळसळते सर बाभुळिचे बन
कधी भयानक कधि अति भावुक
घटनांचे ते करि दिग्दर्शन

निज हाडांची करुनी काडे
अन् रुधिराचे करुनी पाणी
श्रमिक बिचारे ग्रामातिल त्या
जगती जीवन केविलवाणी..!

काळ्या मातीतून निर्मिती
अमल करांनी अमोल मोती
साकारुनिया स्वप्न धरेचे
दीन बिचारे कृषक नांदती

* * *

कवेत घेउन कलश जलाचा
कुच युग्मावर तरल कंचुकी
घटांत दडवुन नुपुरांचा ध्वनि
नकळत येते सतलज अंकी

"जगिया ! जगिया ! ये ये सखया
कटिवर भरलीं घागर चंचल"
"अग ये नूरन ! ऐकत होतो
घागरीतले गुणगुणते जल..!"

"खुणाविता मज अलगद् आले
झप झप चालत मी सांदीतुनि
चुकवुन अगणित अवखळ नजरा
विसावण्या क्षण तुझिया चरणी"

फडफडली सलवार रेशमी
उडली अलगद् तलम ओढणी
" दिवास्वप्न पाहते हुरी का ?
सखये नूरन तुझी शिराणी "

" कुप्रसिद्ध डाकूचा मी सुत
कुलीन कन्या तू तर नूरन
प्राणार्पण करशील काय तू
जगियाला या अर्पुन तन मन ?"

वदला जगिया "शीख युवक मी...
मुसलमान मुन्नी तू नूरन
भिन्न रक्त अन् विभिन्न जाती
कसे न येइल रुढिचे दडपण ? "

"आजवरी मी कधि न चिंतिले
रमता प्रतिदिन तुज सांगाती
धर्म, जातिच्या जीर्ण शृंखला
तोडुन जुळतिल अपुली नाती.."

"समजुन उमजुन तुझी जाहले
अडवु न शकले टिकास्त्र जहरी
ध्यानि मनी अन् स्वप्नी राया
तुलाच पुजिले हृद्गाभारी..! "

"डाकुपुत्र हा परंपरागत
कलंक रुळला अमुच्या भाली
बाप लटकला फासावरती
स्मरत आज अंतीम काहिली..!"

"तरारले कां नयनी पाणी ?
कशास स्मरता विगत कहाणी ?
जन सेवेतच झिजता राया
स्वयंसिद्ध अनिकेत राहुनी...

जळत जळत मी शमा झिजतसे
उरात अविरत तुझीच मूर्ती
लपत छपत मी चुकवुन नजरा
रमते राया तुज सांगाती...

धिक् धिक् असले अबला जीवन
धिक् धिक् कुजले समाज बंधन
अेक पाकळी दोन आसवे
असुन मनीषा घडे न मीलन"

"सखये नूरन खरिच शमा तू
तव ज्वलनातच भविष्य उज्वल
काजळातुनी उजळे प्राची
घर आभाळातली धरातल..

चल ये नूरन गुंफू आपण
ओष्ठद्वयाच्या मागावरती
अभिवचने ही प्रणयतंतुची
साक्षी ठेउन शशी सभोती...!"

"जगिया ! राजा !" वदली नूरन,
"रजत रसातच न्हाऊ आपण
तरल विरल या दुग्ध धुक्यातुन
अभिनव विश्वा निर्मू आपण..!"

"शपथ तुझ्या उत्फुल्ल तनूची
नकोस विसरू रात सुहानी
अधर फुलातिल पराग अपुल्या
श्वासांनी ही लिहिल कहाणी.."

सतलज गाते मंजुळ गाणी
"जगिया राजा नूरन राणी
भाव फुलांच्या दोन पाकळ्या
अेक दिवाणा, अेक दिवाणी..!"

"भरली नूरन यौवन घागर
वाट पाहते अंतरिचे जल
तृषित मीहि अन् तृषार्त तू पण
नको आडवा सलज्ज अंचळ..

नकोच नूरन मधले अंतर
दोन जिवांचे जुळता नाते
दूर सरकता लज्जेचा पट
लाजाळूचे खुलेल पाते...!

पिउ दे घटघट शराब सखये
ओठावरच्या सरस कळ्यातुन
सतलजचा हा निळा किनारा
अचूक कोरिल हे चित्रांकण..

पर्णींची बघ प्रशांत झाली
अवती भवती अवखळ सळसळ
संथ संथली सरिता अधरी
मंद सुरातिल सुरेल झुळझुळ"

स्थिरावले क्षण वाळूचे कण
स्थिरावले मन स्थिरावले तन
"नुरले मज अस्तित्व आगळे
अविरत तुमची" वदली नूरन

बगळ्यांची नच धवल भरारी
बकुलफुलातील धुंद परिमल
अनिमिष नयना, विगलित वसना
जडावली नुर करपाशातिल..

अेक स्कंधी, अेक कपोली
जगियाचे कर नकळत गेले
अनावर मने, धुंद लोचने
प्रणयाचे मग विणले जाळे...

"पाहिल ना कुणि" वदली नूरन
"कुणी न येथे भितेस कां तू ?"
"पुरुषांना या कळतिल कैसे
स्त्री हृदयीचे कातर किंतु ?"

"कुरंगनयने ! तृणांकुरासम–
नकोच अधरी सशंक थरथर
अेक हृदय हो तुझे नि माझे
अधर टेकता तव अधरावर..!"

बिंब, बिंब प्रतिबिंबित होता
नूर नजाकत ऊर दर्पणी
झरझर वाहिल अमृत ओठी
भल्या पहाटी, मुग्ध कामिनी..

पालटला नुर, हसली नूरन
थरथरली नवतनू गव्हाळी
अनिमिष लवली, स्निग्ध कौमुदी
नजरेमधली नशा वेगळी...

श्वासामध्ये श्वास समावुन
दो अधरातुन झरले अमृत
साक्षी ठेउन कणाकणाला
घडावयाचे घडले अवचित...

हसले खुद्कन् वाळूचे रण
कण्हले किंचित् मनातले मन
भरली घागर अबला जीवन
तडा कधी अन् दुभंग जीवन...

स्थिरावले क्षण उरात स्पंदन
सतलजचे पण हलले पाणी
कुजबुजली कुणि अवखळ उल्का
"स्त्री जन्मा ही तुझी कहाणी !"

अवती भवती नव्हते कोणी
खेळत दोघे राजस वाणी
तीर उरी, कुणि कुजबुज कानी
"स्त्री जन्मा ही तुझी कहाणी..!"

नील जलावरि सोडून नौका
सत्यवतीची कण्हली काया
अवखळ हसला ऋषी पराशर
प्रतारणेच्या जगामधे या..

अवखळ हसले अलिकुल सारे
सलिल सारणित वदे पद्मिनी
" स्त्री जन्मा ही तुझी कहाणी
हृदयी अमृत नयनी पाणी..!"

लवहि न द्रवली निर्मल नूरन
वदे " प्रेम हे नच आसक्ति
शुद्ध प्रीतिच्या नभोप्रांगणी
अेक सितारा उज्वल भक्ति..!"

वनपुष्पाच्या परागातुनी
सुक्ष्म पसरला शीतल परिमल
जगियाच्या पौरुष वक्षावर
अलगद् रुळली नूरन अविचल..

सतलजच्या त्या प्रमत्त लाटा
फोडित होत्या तटास भवती
चैतन्याची प्रतिमा गोंडस
कुशीत प्रतिदिन वाढत होती...

गुंफित होते प्रणययुग्म ते
सुख स्वप्नांच्या रेशिम गाठी
सतलज सरिता ऐलतटावर
अलिप्त बसुनी भल्या पहाटी...

घरकुल सोडुन विहगद्वय ते
विहरत अविरत त्या ऐलतटी
झरझर ओतित अमृत ओठी
अलिप्त बसुनी भल्या पहाटी..

नील धवल सतलजच्या काठी
तलम वाळुतुन जुळवित ओळी
निळ्या पाकळित स्वप्न उद्याचे
संभ्रमि रमते गर्भ कर्दळी ..!

* * *

आणि अचानक घडले अद्‌भुत
चमकुन गेल्या नग्न संगिनी
करी थडकल्या कवच फोडुनी
क्षणैक हलली सवत्स धरणी..!

जागृत झाली शक्ति पाशवी
हवेत उडल्या हिंसक फैरी
स्वर अधरीचे अधरी विरले
रक्त उसळले शांत अंबरी.

हिंदू मुस्लिम भाऊ भाऊ
स्वप्न महात्मा जपे उराशी
उर फोडूनी असेल रडला
पाहुनिया प्रेतांच्या राशी.

थरारला कण वसुंधरेचा
रुधिरी जो न्हाऊन निघाला
अेक पुजारी मानवतेचा
विश्व वर्तुळी विलीन झाला.

'बापू' तुमच्या भावफुलांचा
गुच्छ आज हो कसा निखळला !
दानवतेने स्वार्थासाठी
मानवतेचा गळा कापला !

प्रदान करुनी दान जिवाचे
दानवास तू दिलीस दानत
रक्त अेक पण मातीसाठी
मानव बनला मलीन अवनत...!

क्रुद्ध क्रुसावर कण्हला येशू
विद्ध पापणित प्रशांत गौतम
टपकत राहिल रक्त उरातुन
बघुन बापुचे स्वप्न भग्नतम.

सत्य, अहिंसा, शांतीवरती
रक्ताश्रूंचा सडा शिंपला
द्रवली हृदयी माय भारती
कण मातीचा कण्हला भिजला ..!

शरपात्यावर धरुन अहिंसा
हिंसा करिते भीषण नर्तन
सरणावरती खच प्रेतांचा
मानवतेचे विपरित दर्शन...!

'बापू' तुमच्या शांत भारती
जागृत झाली पाशवि शक्ति
सलिली शोणित जल जलवन्ती
बंधु प्रीति नच भग्न संस्कृति...!

शांत गभीरा वसुंधरेवर
आज अचानक चढली लाली
कूस कापली हिंद मायची
उरे न कुंकू अगणित भाली

द्वेष, रक्त, अश्रूत नाहते
हिंद संस्कृती पुनीतास्मिता
ज्वालेमधुनी जळलेल्यांच्या
जीविताची कां हीच सांगता ?

क्षणात विरली नाजुक नाती
मातृप्रीतिचे नग्न विडंबन
कुशी उसवल्या तीक्ष्ण शरांनी
ऊर उसवले भिजले लोचन.

अर्भक असता मातृ अंचली
मानेवर घुमतात संगिनी
रक्ताच्या थारोळी भिजल्या
अगणित हिंदू माताभगिनी.

कलेवरांच्या कुजल्या राशी
नग्न माय अन् बाळ उराशी
नश्वर पणती, विझल्या ज्योति
विभाजनाची व्यथा ही अशी.

झरता शोणित नयनामधुनी
झाली अविचल करुण पापणी
मरणांताने व्यथा थांबल्या
व्याकुळ झाली पीडित धरणी .!

मृत आशांच्या चिता पेटल्या
पिशाच्च फिरती अवती भवती
कराल ज्वाला कलेवरातिल
तप्त शलाका रक्त ओकती

घालित घिरट्या क्रूर गिधाडे
तोडुन लचके, ऊर फाडती
शतशतकांची स्वप्न-संगती
वितळत जखमा, भिजली माती.

मातीचा सुत विराट मानव
उरात खंजिर, म्हणे "विभाजन !
कणकण कापुनि उर आईचे
दोन तराजुत तोलू आपण.."

काय अवनती मानव्याची
न्याय नीतिचे मुळी न बंधन
योनि उसवल्या शरपात्यांनी
लिंग वासना बिभत्स नर्तन !

नग्न करुनिया लुटल्या युवती
भग्न मंदिरे खंडित मूर्ति
राष्ट्र अस्मिता मातित मिळतः
कशी उरावी आर्य संस्कृति ?

चरचर चिरुनि उरज कंचुकि
वसनवंचिता भयार्त वदना
कामार्तित नरपशू करांनी
अगणित लुटल्या अबल यौवना

लिंग कापुनी देत करावर
वदे नवोढा..." काय विडंबन !
द्रौपदिचे करि लज्जारक्षण
कधी प्रभू ये पुनश्च धावुन ?"

स्तनाग्रावरी ठेउन भाले
नग्न उचलता वदती वनिता
"इतिहास तुझा उज्वल आता
कुठे लोपला सांग भारता ?"

पिचले मनगट, फुटले बिल्वर
पट लज्जेचा पडला खाली
विवस्त्र कातर दग्ध कामिनी
मृगया बनल्या रजत महाली.

भिरभिर बघती स्वजन लोचने
कंठी आले प्राण सुकोनी
शुष्क खोलगट उदरे त्यांची
धाप टाकती आक्रंदोनी..!

शोणित शिपुनि लाल जाहली
अबोल पाने इतिहासाची
शब्द संगती अविरत कण्हते
व्यथा भयानक विभाजनाची..!

ऊर दुखावे माय भूमिचा
दोन सापळे उरले विगलित
विकल जाहली सत्यअहिंसा
उदात्त मंदिर मूर्ति विरहित..!

झरती व्याकुळ रक्त शलाका
सतलजच्या अति शांत जलावर
अग्नि रसातच रुळले पल्वल
गहिवरला मनि ओला दहिवर...

पडता अवचित अेक शलाका
रक्ताच्या वर उडल्या धारा
कडाडली नभि क्रूर चंचला
उधानला उरि उनाड वारा..

खिळखिळले किती अस्थिपंजर
भेदरल्या भय व्याकुळ नजरा
विभाजनाच्या ज्वलंत अग्नित
धडधड जळले 'मनोमाजरा'...!

अबोल मुग्धा प्रियदर्शिनी
गत स्वप्नांची उजळित पणती
भावुकतेच्या विमल उपवनी
भावफुलांना फुलवित होती...

धन्य कराया कूस मायची
कुणी अबोली होती आतुर
करीत चाळा करकमलाशी
खिदळत होते विलोल बिल्वर..!

कसे अचानक अवती भवती
दिशादिशातुन उठले काहुर
"कहा छुपे हो हिंदु हरामी
जान प्यार तो निकलो बाहर..!"

"लुटने दो तो मस्त जवानी
खिलापिलाके तुमने पाली."
विवस्त्रांगना करित अंगणी
वदले कुणि कामांध मवाली..

घरकोलातुन ढाळित आंसू
पुटपुटले मनि 'मनोमाजरा'
"विद्धकंठ खग वळचणिखाली
तुटले रे तव पंख पाखरा..!"

फडफडली नव दीपकळी ती
वर्तुळात जी होती तेवत
घेउन गिरकी मूक पाखरू
जग शून्यातच बसले वसवित

"साले जगिये मस्त पडा है
साथ सिनेपर नयन शराबी"
कर्कश रव हा पडता कानी
क्षण वक्षावर हलली छबी..!

" यहि मौका है मस्ति मिटाने
और भगाने बीबी नूरन.."
शब्द घुक्यातुन पडता कानी
थरारले क्षण वाळूचे रण..!

नृत्य निवळले निळ्या लोचनी
कर्णपटावर स्थिरावता ध्वनि
" आओ लौंढी हमे पिलाओ
मस्तिभरी अब तेरि जवानी..! "

क्रूर पशूंनी कशी ओढली
करवंदीतुनि नाजुक हरिणी
फोडित बिल्वर खद्खद् हसले
" लुटो..लुटो यह मस्त जवानी..!"

नूर चिथावे नरसिंहाचा
नूरन नेता करपाशातुन
उडी मारुनी फोडित नरडी
वदे,..'न जगणे जगिया हातुन..!"

वदे, कडाकड फोडित नरड्या
" दैवत अमुचे महिला मंदिर
पडता अरिकर किंचित् त्यावर
फोडिन सत्वर दुस्तर प्रस्तर..!"

क्षणात पाडुनि खच प्रेतांचा
वदला जगिया.."ये ना नूरन
विसावुदे मज शिणलेले शिर"
हसे चांदणी सजल धुक्यातुन...

नुर अंकावर घेत विसावा
दवयेंबासम जरा पहुडला
"ठहरो जगिया खुनी हरामी"
खवळुन वदल्या अदय शृंखला

हृदयी दडवुनि पराग अपुला
कळवळुनि मनी वदे प्रेमला,
"पाया पडते पोलिस दादा
कसे पकडता निष्पाप्याला ?

स्वरूप यांचे कुशीत माझ्या
शपथ वाहते या गर्भाची
मुले नि बाळे असतिल तुम्हा
दया येउ द्या दोन जिवांची !"

खळखळल्या करि क्रुद्ध शृंखला
कभिन्न काळ्याकुट्ट मयाली
चुकचुकली कुणि पाल विषारी
व्यथित उराने दिली काहिली..!

घालित घिरट्या भूत मनीचे
मृत आशांच्या चितेभोवती
पत्थरातुनी पाझरती ध्वनि
" उरति आसवे नूर संगती . ! "

निळ्या नभातिल निळवंतीने
धवल धुक्यातुन दिधली ममता
" येइल नूरन सुटुनी जगिया "
धीर देतसे सतलज माता . !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९६८८३
दा.क्र.

*   *   *   *   *

"विकल नेत्रिच्या व्यथित आसवा
जा ओलांडुनि विशाल भिंती
त्रस्त नूरला आत्मनिवेदन
देतो मित्रा तुज सांगाती . . !

असेल दु:खी अैलतटावर
विगत स्मृतीचे जुळवित धागे
विद्धपंख पक्षापरि उकलित
पिसामागुनी पिसे सवेगे . .

ढाळित आंसू असेल जाई
स्मृती आमुची सहज उगवली
नूर नयनिच्या आसवात ती
असेल आता अधिक वाढली . .

नीलदलांची धरुनी छाया
करुण निधाना असेल राखित
अर्पित अंजलि धवल फुलांची
नुर सुकलेला हळु गोंजारित..!

असतील शिरी केस विखुरले
चिंब सुलोचन भिजवित अवनी-
श्वासामधुनी शून्यावरती
नूर असावी लिहित कहाणी..!

उघडया मिटल्या नयना पुढती
असतिल तरळत काजळरेखा
क्षणाक्षणाला पडत असावा
मधुर क्षणांचा शामल विळखा...

आसुसलेल्या शिंपल्यातुनी
भक्तीचे तेवते निरांजन
उभी असावी आर्त आरती
करित प्रतीक्षा माझी नूरन..

द्रवरूप असशि जरि आसवा
अेक अनामिक ओल उरी तव
भिजवुनि माझ्या अगतिक आशा
जा पंखावरि घेउनिया तव

मावळतीच्या मेघाप्रति ती
असेल मागत पदर पसरुनी
"जा रे मेघा उधळित रथ अन्
ये जगियाला परत घेउनी...!"

साकळुनी उरि अनंत जखमा
जा ओलांडुनि प्रचंड गिरिवर
दग्ध नूरला देत दिलासा
अलगद धद विरहाचे काहुर..

'व्यथा' आसवा स्थायिभाव तव
तू न सुखाचा सखा सोबती
कुरवाळुन करि सुकलेली कळि
टिप..टिप नूर नयनिचे मोती..!

वनि पर्णाविण अुभावलेली
पुष्पलता पथि जर तुज दिसली
स्पर्शाविण टिप सलिल तियेचे
फुलव सखीच्या गुलाब गाली..

विरहामधली अतिव विकलता
चकोरातुनी टीप आसवा
नलिनीच्या नच निरोप कानी
स्पर्श रेशमी असो राजिवा...

पापणिच्या पंखात झोपल्या
असतिल भवती अवखळ नयना
"झोप न आई" करित बहाणा
असेल राखित करुण निधाना...

कभिन्न कातर काजळराती
जळत असावी केशर ज्योती
जवळुन बघता जरा आसवा
दिसेल नाकी हलता मोती...

आसुसलेल्या दोन आसवा
असतो सोबत अेक अुसासा
दुर्मुखलेल्या दोन दिलांना
दु:खच अंती देत दिलासा..!

सांग नूरला जगतो जगिया
कारागृहिच्या भिजवित भिंती
साकळुनी मनि नूर नूरचा
आयसदंडा डोक्यावरती..

तुझ्या रेशमी करांगुलीने
जागव जपुनी विरह साधना
निद्रेविण जड मिटुनि पापणी
मुक्तिस्तव मम करित अर्चना

भल्या पहाटे मिटुनि कौमुदी
बघत असावी स्वप्न गुलाबी
स्पर्शाविण दे शांति आसवा
खुलव सखी सविकल्प समाधि..

सिंचुनि निशिदिनि नीर लोचनी
नेत्र पाकळचा दिसतिल निष्प्रभ
विरहाची चिर ऊर दर्पणी
गालावरचे सुकले सौरभ...

गालावरची खळी गुलाबी
शराब आटुनि शुष्क जाहली
अधर फुलांची मिटुनि पाकळी
आसवात तुज दिसेल भिजली..

पिंपळपानाकृति कुडचाही
मलुल जाहल्या असतिल झुरुनी
प्रथम भेटिची खूण आमुची
विभाजना तव विचित्र करणी...!

निर्विकार नुर असेल शोधित
शून्यामधुनी सुखावले क्षण
नील पुलिनिहुन कधि मंदानिल
नेत तिच्याप्रति स्मृतिकण वेचुन...


... ग्रंथसंग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 75932 ...... वि: काव्य......

येत असावी नदी किनारी
घुमे घुण्याचा करुन बहाणा
कवटाळुनि उरि विकल क्षणांना
नाजुक सजणी, छंद दिवाणा..!

विसतिल मित्रा तुला कदाचित्
नील साडिच्या लाल किनारी
जये लाविले नादी मजला
केली आणिक जखम जिव्हारी...

गडचा आसवा ! प्रणय प्रेषिता !
सोडुनि हृत्पल मार भरारी
शर विरहाचे जात भेदुनी
करि सांत्वन, मी येत सत्वरी"

मृत स्वप्नांच्या राखेमधुनी
आकारित भवितव्य आकृती
असता जगिया अगतिक पडला
वृत्त विषारी घुमले भवती...

द्वारपाल तो कुजबुजला कुणि
"जाती मुस्लिम भारत सोडुनि
शतशतकांची नाजुक नाती
तुटतिल लवता नेत्र पापणी. !"

रक्त ओकली विरक्त बुबुळे
पराग गळला जळला मोहर
भरुनी झोळे बघण्यास्तव नुर
मना मुक्तिची अमाप हुरहुर .!

* * * * *

जळती ज्योती वदे धुरातुन
"स्वरूप देउनि दुरावला तू
दडवुनि तुजला खोल अंतरी
दूर चालली नूर परंतु . . .!

म्हणोत म्हणतिल माय कुवारी
कुशित शूर सिंहाचा छावा
जातियतेच्या जबड्यामधुनी
कळे न मज मी कसा जपावा . .!

तुझ्या नि माझ्या अधरावरचे
हसू बिलगले कुशीत माझ्या
कुठे लाट अन् कुठे किनारा
कशि लपवू मी यव तू राजा ?

विद्वेषाचे विराट वादळ
प्रेतराशिहुन फिरे भैरवी
वैफल्याच्या वर्तुळात मी
दीपशिखा ही कशी जपावी . .

कशी जपु मी हा नंदादीप
क्रूर अरी कुणि घालिल फुंकर
हिंदुशिखाची रक्त शलाका
कुशीत कळता फुटतिल बिल्वर..

भाग्य भारता कुशीत माझ्या
तव रूपाने अंकुरले नभ
चमकत राहिल चंद्रकोर ही
अस्त्र अरींचे बनतिल निष्प्रभ..!

कसा टिकावा दिव्यगोल हा
पडता विळखा कृष्णकडांचा
बघशिल का पण.." वदली नूरन
"श्वास अेक हा दोन दिलांचा..!

विरह व्यथेचे गिळुन हलाहल
लोक टिकेच्या पचवुन ज्वाला
शस्त्र शिरावर सतत विषारी
सोडुन भारत निघणे मजला..."

नीलदलाच्या पात्यावरचा
थेंब दवाचा जरा न ढळला
थेंब सुके अन् गळले पाते
अर्थाविण हा ध्वनीच उरला..

अधरावरची लकेर अवखळ
अलगद् आली, अवचित गेली
क्षणैक रुळली, किंचित हसली
उरवुन गेली विरह काहिली.

"दोन सुरांचे गीत आगळे
झंकारित नित हळवे स्पंदन
साक्षी ठेवुनि शुक्र चांदणी
तुजविण राया झिजते कणकण..!

शोधित वाटा काजळातुनी
अगतिक आणि अपथगामिनी
अेकाकी अनुक्रमणे आता
खडतर रस्ते मज अनवाणी

आसुसलेल्या दोन आसवा
अंतरि अुरला अेक उसासा
असह्य होता व्यथा उरातिल
मरणा...! देशिल काय दिलासा ?

'जगिया' अपुल्या जखमेवरती...
घालिल का कुणि हळूच फुंकर
किणकिणतिल का पुन्हा कधितरी
निळ्या तिरावर नाजुक बिल्वर ?

उमलतील का धुंद पाकळ्या
पराग उधळित मस्या पहाटी
दरवळेल का सुगंध शीतल
पुन्हा अेकदा तरुतळवटी ?

निःश्वसिते ती तुझी नि माझी
असोत त्यांचे पंख सलामत
दोन तिरावर दोन पारवे
पिसे प्रीतिची बसतिल उकलित "

विद्ध जाहली आज पक्षिणी
विभाजनाच्या शरपात्याने
वदली नूरन, "असह्य मजला
जगिया त्याचुनी विफल जिणे !"

व्याकुळली मनि स्मरण पाकळी
परागातची व्रवला परिमल
थरथरली आणि प्रशांत अवनी
उरी विव्हळला मधु मंदानिल

भावसंगमी जुळली नाती
भावुक हळव्या दोन फुलांची
कुजबुजला कुणि उनाड वारा
"संगत तुमची युगायुगाची !"

"कशी जगू मी ? परंतु जमणे
मुक्या मनावर व्यथा पांघरुन
दडवुन अपुल्या जखम अंतरी
पिणे हलाहल.." वदली नूरन..!

होवुनि खाचा मिटति पापण्या
नीरवता हृदयातुन झरता
विरहामधली आग जाळिते
शून्यामधुनी विश्व निर्मिता

धुके बनूनी मुके पाखरु
घेअिल गिरकी नभो वितानी
झळ साहुनि कसे जमावे
पंखाविण जगि विद्ध जिवांनी ?

* * * * *

गर्द काजळी भयाण राती
रातकिड्यांची किरकिर भवती
रूप विलोकित तुरुंगाप्रति
सौदामिनि ती निघे अेकटी

निद्राधिन जन सकळ जाहले
स्वप्नसंगमी रमल्या मुग्धा
कारागृहिच्या कराल द्वारी
उभी अेकटी सहत आपदा

साद घालिते अभागिनी ती
"जाते राया सोडुनि भारत
पुन्हा ऐकु दे तव रुपाने
सतलज तिरिचे सुप्त मनोगत..

जाता जाता पुन्हा अेकदा
रूप भरू दे तुझे लोचनी
शिपल्यातले थेंब स्वातिचे
कण्हतिल अविरत तुझी कहाणी..

पाया पडते जेलर दादा!
कर जगियाचे पडु दे कंठी
ताटातुटिच्या भेटी घडता
झरझर येअिल अमृत ओठी"

माय कुवारी पुन्हा मारते
किंकाळी अतिदग्ध उरातुन,
"जगिया दे प्रतिसाद प्रियकरा
'कराची' त मग झुरणे कणकण!"

संगमउत्सुक अभागिनी ती
'नूर' धडकली क्रूद्ध गजाशी
काम पूर्तिस्तव वळला जेलर
उधळित कटु हास्याच्या राशी.

"आओ प्यारी लुटने तो दो
जवानिकी ये झुलती दौलत"
मनगट धरुनी वळता जेलर
नुरन पळाली साधुनि ग़फलत

काळोखातुनि जुळवित वाटा
अेकाकी नुर पुन्हा परतली
आशिश घेण्या वृद्ध मायचा
गृहि जगियाच्या सरळ निघाली.

तुटक्या खाटेवरती पडुनी
रडता रडता माय झोपली
दारावरची थाप ऐकुनी
वेड्यासम ती त्वरित धावली.

"जगिया ! जगिया ! येरे बापा !
वाट पाहते दिव्यासारखी
म्हातारीची अेकच क़ाठी
नकोच देवा करु पारखी.. !".

कडी उघडते माय आंधळी
स्वर कातर पण पडती कानी
"मी नच जगिया. .नूरन, आई !"
वदली विनया माते चरणी

"तेवत राहिल कुशीत माझ्या
वंशदीप हा तुझा अविरत
दे आशिर्वच, नूर अभागी
जाते सोडुन सुवर्ण भारत

माय पोटच्या गोळ्यासाठी
तुटतो तिळ तिळ जीव जिवातिल
जगिया येता, सांग माउली
तुटला तुकडा तुझ्या उरातिल

जगियाच्या अति पवित्र चरणी
नुर अश्रूंचा वाही गजरा
थेंब उरातिल तव रक्ताचा
फिरेल वणवण विना निवारा

शीतल वारे पुन्हा न वाहिल
पुन्हा न पाहिल चैत्र पालवी
प्रमत्त लाटा शांत किनारा
यमुना श्यामल. . .धवल जान्हवी . !

सत्य, अहिंसा, शांति भारती
विस्मरणातच विलीन होतिल
हिंदभूमिची धवल अस्मिता
स्वप्न होउनी स्मृतीत राहिल

दुर्लभ मिळणे जन्म भारती
अंगाऱ्याचे मोल धुळीला
पदकमळी तव पवित्र आई
कणाकणाने देह वाढला

कणकण येथिल ढाळिल आसू
माय भारती, उरे तव स्मृति
दुःख असावे अखेर सोबत
स्मरणाची पण नको विस्मृति

नेईल आई मज अग्निरथ
आज पहाटे तुडवित नाती
दोन दिशांना दोन उसासे
मूके पाखरू मज सांगाती. !"

"रोना नहि तू बेटा नूरन"
मातृउराने दिला दिलासा
"जगिया आये तुम्हे छुडाने"
वृद्ध मायचा स्निग्ध उसासा..

* * * * *

अग्निरथा तुज कशी दिसावी
क्रौंचाची अतिविव्हल आकृति
कवेत असुनी आज आगळी
हाय मानवा, काय विकृती...!

असेल पडला खच प्रेतांचा
वळ अंगावर निळे जांभळे
फलाटावरी लुकलुकणारे
उजाड, जख्खड सजिव सापळे..

अेकच डोळा, कुणि हाताविण
पाय कुणाचे मुरगळलेले
रक्ताविण किति अस्थीपंजर
रक्तामधुनी बरबटलेले .

असे अभागी अपंग मुस्लिम
अग्नीरथ तो निघतो घेउन
धगधगणाऱ्या वक्षामधला
अेक निखारा जळतो प्रतिक्षण .

"सुजलाम्, सुफलाम् मायभारती
तुझें चरणरज असु दे भाळी
राख माउली, जगिया माझा
प्रीत आमुची जगावेगळी!"

चक्रताल जणु देत उसासे
निघे अग्निरथ कराचीकडे
मुक्या कळीच्या निःश्वासातुनि
निखळत जातील दीर्घ तडे....

*    *    *    *    *

जागल्या संवेदना भग्न झाल्या शृंखला
तोडली कुणि बंधने ? मुक्त कैदी जाहले
मूर्त चैतन्याच्या उरी पेटल्या साऱ्या मशाली
भडकले हिमशृंग सारे उसळत्या दीप्तानले !

कबंध कर्कश कारागृहिचे
कराल काळे दुस्तर प्रस्तर
क्रुद्ध भयानक गज पोलादी
वदले, "वाचव नूरन सत्वर..!"

"येत तडातड तोडुन बेड्या
पुनश्च तुझिया कुशीत आई"
अस्फुटले स्वर मातृउरातुन
"वाचव नूरन, तुझी भैरवी..!

स्फुंदत स्फुंदत निघे अग्निरथ
सोबत नूरन माय कुवारी
तुझ्याविना तिज कुणी न वाली
मार पाखरा त्वरित भरारी..!"

प्रक्षुब्ध झाल्या भावना
ओलावल्या साऱ्या व्यथा
जीवनाला जीवनाची
जोड देण्या सर्वथा...

"आटले कां रक्त माझे सुप्त हो संवेदना
उममल्या जरि दर्पणाच्या दर्पणाला वेदना
लोचनांना लोचनांची ना साहवे आलोचना
नूर रुपावीन आता अंतरी ओकेपणा...

नाद आता संपला उरला रिकामा हा घडा
विरहामुळे जळणे अता विलगतेच्या या तडा
आसवांनी आवरे का आसवांची आर्तता ?
आरक्त बनुनी ओकती का अंगार हे डोळे अता ?

भावनांना पंखाविना येईल का भरती पुन्हा
पेटता वणवा उरीचा होईल का मग सांत्वना ?
करपलेल्या कल्पद्रुमा निष्कंप हलवी कानना
नेत्रगोलातील अस्त्रा अग्नीरथा भिडशील ना ?"

तूटता करबंधने केली मनाची मुक्तता
आलिंगण्या अग्नीरथा सोडुनिया साऱ्या व्यथा
आतूरला जीव नूर साठी प्रस्फुरली प्रक्षुब्धता
सुकलेल्या साऱ्या समीधा संतप्त झाल्या सर्वथा..

अनल जाहल्या नयन शलाका
पुलकित हो स्फुल्लिग नसातुन
बर्फ पेटले उठल्या ज्वाला
अर्घ्य अर्पण्या रथचक्रातुन

मार्ग काढला त्वरित धुळीतुन
नुर विरहाच्या जुळवित ओळी
करवंदीच्या जाळीमधुनी
उडी मारली...जरा आगळी..

"अग्निरथा या वाचवि वीरा
दाहक जरि हे दिव्य अनाकृत
पुलावरी जो दोर काप तू
आसवातची स्थिरावते स्मित..!

गत इतिहासा दिली आहुति
संगिनिच्या या जर धारेवर
विद्ध पाकळ्या अग्निरथातिल
पटपट गळतिल क्रुद्ध रुळावर..!

अेक अनामिक अबोल आत्मा
अलगद दडवुन दुःख उराशी
वाट पाहुनी शिणल्या नयनी
अश्रु कणांच्या रचेल राशी. ."

अति आर्त होती लोचने
आकारण्या सुख शिल्प ते
उदात्त प्रीतीला जगी
जगणे असे का लाभते ?

तेवती तेलाविना ती
नि:श्वसिते नीरांजने
"तुझ्याविना नूर यापुढे
जगणे नको जगती जिणे..!"

वाण सतीचे, कृपाण हाती
नरशार्दुल तो चढतो वरती
दोर छेदितो क्षणी सत्वरी
जात अग्निरथ विन अपघाती...

अज्ञातातुन सुटते गोळी
उर जगियाचा जाते भेदुन
अवतरला ध्वनि रक्तामधुनि
"स्वर्ग सिमेवर भेटू आपण..."

क्षणैक लवला आधाराविन
अंतिम ग्लानी, देह अचेतन
पडला धडकन् रुळावरी अन्
अवनीचा उर द्रवला दर्पण...

शहारली कुणि निळी पाकळी
थेंब दवाचा गळता खाली
अस्तित्वाविन अगतिक छाया
अधरावरची अंधुक लाली..

अेका पार्थिव देहा अविचल
अग्निरथ क्षणि गेला तुडवित
पंखाविन कुणि विकल पक्षिणी
अनंत जखमा असेल अुकलित...!

सत्तेचाळिस ऑगष्टातिल
स्मृति अविरल ही तरल यामिनी
सुकलेल्या या दोन कळ्यांची
विलापिका नित गात, विराणी...

रक्त निथळते अवती भवती
भग्न प्रीतिच्या अवशेषावर
कण कण येथिल आजहि कण्हतो
अिथेच फुटले अखेर बिल्वर !

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१६९८३
शाखा (स्थळ प्रत)
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ८५९३२ वि: काव्य
क्रमांक १६९८३ नोंद दि २८/३/८१
REFBK-0016983
REFBK-0016983

# आमची नवीन प्रकाशने

## ग. त्र्यं. माडखोलकर

* मी आणि माझे साहित्य १०-००
* अरुंधती ७-००
* व्यक्तिरेखा १०-००
* पखरण १०-००
* माझे लेखनगुरु ८-००
* निर्माल्य ६-२५
* माझे आवडते कवि ९-००
* माझे आवडते लेखक ७-००
* मी पाहिलेली अमेरिका ८-००

## पु. य. देशपांडे

* बंधनांच्या पलीकडे ८-५०
* विशाल जीवन ९-००
* काळी राणी ९-००
* आहुति ५-००
* अनामिकाची चिंतनिका ५-००
* अनुभवामृत रसरहस्य खंड १ ला १२-००
* ,, खंड २ रा १५-००
* ,, खंड ३ रा १६-००

## साहित्य अकादमीच्या वतीने अनुवादित कादंबऱ्या

* दोन शेर धान—सौ. उषा कोलते ५-००
* आरण्यक—शं. बा. शास्त्री १०-००
* आरोग्यनिकेतन – श्रीपाद जोशी १५-००

✱

* चंदनवन—कै. स. अ. शुक्ल ६-००
* भारतीय लोकशाही : काही विचार—मा. प. मंगुडकर ६-००
* कणसा कणसा दाणा दे—जयकुमार भुसारी ... ३-००
* असे होते ज्ञानेश्वर— न. प. महाजन ... ३-५०
* नूरन—अविनाश वरोकर
* कथा ही मुक्या पाखराची—अविनाश वरोकर

✱

नागपूर प्रकाशन,
धनतोली, नागपूर १

*नागपूर* प्र का श न

नागपूर प्रकाशन,
सीताबर्डी, नागपूर १

Cover Printed at--Shakti Offset, Nagpur.